RNI MAHMAR
36829-2010

ISSN - 2229-4929

Peer Reviewed

# Akshar Wangmay

International Research Journal
UGC-CARE LISTED

## Progressive Thinkers of Maharasthra

JANUARY 2020

*Executive Editor*
**Dr. Subhash Nikam**
Principal,
Mahatma Gandhi Vidymandir's
Karmaveer Bhausaheb Hiray
Arts, Science and Commerce College,
Nimgaon, Tal. Malegaon Dist. Nasik (MS)

Co - Editor
**Asso Prof. Subhash L. Ahire**

Chief Editor : Dr. Nanasaheb Suryawanshi

Address : 'Pranav', Rukmenagar,
Thodga Road, Ahmadpur, Dist. Latur 413515

Scanned by CamScanner

RNI : MAHMAR - 36829-2010
ISSN – 2229-4929

# AKSHAR WANGMAY

International Peer Reviewed Journal

UGC CARE LISTED JOURNAL

January - 2020

## Progressive Thinkers in Maharashtra

Executive Editor
Dr. Subhash Nikam
Principal
Mahatma Gandhi Vidyamandir's
Karmaveer Bhausaheb Hiray Arts, Science & Commerce College, Nimgaon,
Tal. Malegaon, Dist. Nashik [M.S.] INDIA

Co-Editor
Asso Prof.Subhash L. Ahire

Chief Editor
Dr. Nanasaheb Suryawanshi

PRATIK PRAKASHAN, 'PRANAV' RUKMENAGAR, THODGA ROAD, AHMEDPUR,
DIST. LATUR,-433515, MAHARASHTRA

**Published by –** Dr. Subhash Nikam, Principal, KBH College Nimgaon, Tal. Malegaon, Dist. Nahik, MS

The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers. The authosr shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.

© All rights reserved with the Editors

Price: Rs. 800/-



Scanned by CamScanner

RNI: MAHMAR-36829-2010
ISSN : 2229- 4929
January - 2020

## FROM THE PRINCIPAL'S DESK . . . . .

Mahatma Gandhi Vidyamandir, Malegaon Camp, was established in the year 1952 under the dynamic leadership of Late Karmaveer Bhausaheb Hiray, the maker of Historic Tenancy Act. In 1961, under the visionary guidance of Loknete Vyankatrao Hiray, M. G. Vidyamandir started colleges imparting higher education. Presently under the able leadership of Hon'ble Samajshree Dr. Prashantdada Hiray, General Secretary and Hon'ble Dr. Apoorvbhau Hiray, Ex-Member of Legislative Council, Maharashtra State more than 225 educational units ranging from primary to postgraduate, research centers and from traditional to professional education are managed by the trust. With this glorious background, Karmaveer Bhausaheb Hiray Arts, Science & Commerce College, Malegaon Camp (Nashik) is a leading educational institute in Nashik District in Maharashtra providing education. The Department Maerathi of the college has been organised a Satete Level Conference on 28$^{th}$ and 29$^{th}$ January, 2020.

Maharashtra is the land of Progressive thinkers. Nimgaon is the birth place of Karmaveer Bhausaheb Hiray. Discussions and deliberations in this conference on the emerging topics, trends & issues will open new vistas of research. It will provide great view for educationist, scholars, and researchers, farmers & students of various disciplines to exchange their viewpoints and experiences in these fields.

I warmly welcome all the participants, delegates and research scholars across India and abroad for this Conference. I also congratulate to the authors and contributors whose papers have been selected by the review committee for including in the souvenir for publication.

**Dr. Subhash Nikam**
**Principal**



Scanned by CamScanner

INDEX


| No. | Title of the Paper<br>Authors | Page No. |
|---|---|---|
| 1 | कर्मवीर भाऊराव पाटील, कर्मवीर डॉ. पंजाबराव देशमुख, कर्मवीर भाऊसाहेब हिरे.<br>प्रा. सुभाष लक्ष्मण अहिरे | 6 - 9 |
| 2 | कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांचे शैक्षणिज ज़ार्यामधील योजदान<br>प्रा. ए. एच. शिंदे | 10 - 11 |
| 3 | डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे महिला सक्षमीकरणातील योगदान<br>प्रा. ए. जी. नेरकर | 12 - 15 |
| 4 | "कर्मवीर विठ्ठलरामजी शिंदे यांचे विचार व कार्य : एक अभ्यास"<br>डॉ. अशोक कडुभाऊ कानडे | 16- 18 |
| 5 | राजर्षी शाहू महाराजांच्या-सामाजीक, शैक्षणिक व आर्थिक सुधारणांचा अभ्यास<br>प्रा. भरत आहेर | 19- 21 |
| 6 | "डॉ.भाऊ दाजी लाड यांची पुरोगामी विचारसरणी व कार्य"<br>डॉ. डि.जे. सोनवणे | 22 - 23 |
| 7 | महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळीत कॉ. डॉ. नरेंद्र दाभोलकररांचे योगदान<br>प्रा.डॉ.गो.पा.फसले | 24 - 27 |
| 8 | पुरोगामी महाराष्ट्र निर्मितीत पंडिता रमाबाई यांचे योगदान व कार्य<br>डॉ. गणपत विष्णू गट्टी | 28 -29 |
| 9 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुरोगामी विचारवंत म्हणून आर्थिक व शैक्षाणिक क्षेत्रातील योगदान<br>प्रा. डॉ. सुनिल बाळू घुगे | 30 - 31 |
| 10 | महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळ दलित चळवळ एक अभ्यास<br>प्राए.हनुमंत भारत सरतापे | 32 - 34 |
| 11 | राजर्षी शाहु महाराजांचे शिक्षण विषयक विचार आणि कार्य<br>प्रा. जितेंद्र डी. पगार | 35 - 37 |
| 12 | महाराष्टातील पुरोगामी राजकीय विचारवंत - यशवंतराव चव्हाण<br>Santosh DattaramJadhav | 38 - 40 |
| 13 | " राष्ट्रपिता महात्मा गांधीजीचे " ग्राम स्वराज्या " बाबतचे धोरण "<br>प्रा. डॉ. कांबळे एम.एस. | 41 - 43 |
| 14 | " भारतीय समाज आणि वैदिक संस्कृतीतून झालेले समाज स्तरीकरण एक विश्लेषनात्मक मांडणी "<br>प्रा. डॉ. गायके संदिपान कोंडिबा | 44 - 46 |
| 15 | "लोकहितवादींचे विचार व कार्य : एक अभ्यास"<br>प्रा.काशिद रामभाऊ देवराव | 47 - 48 |
| 16 | पूर्व खानदेशातील राजकीय-सामजिक चळवळी<br>प्रा.डॉ.मनिष सोनवणे | 49 -50 |
| 17 | महात्मा फुले यांची पुरोगामी विचारसरणी : एक अभ्यास<br>प्रा. मनोज बबनराव देवकर | 51 - 52 |
| 18 | महाराष्ट्रातील पुरोगामी विचारवंत महात्मा जोतीराव फुलेंचे सामाजिक व शैक्षणिक प्रबोधन<br>प्रा.डॉ. नितीनकुमार दादासाहेब माळी. सौ. निलीमा विक्रम महाजन (माळी) | 53 - 54 |




Scanned by CamScanner

# डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे महिला सक्षमीकरणातील योगदान

प्रा. ए. जी. नेरकर
मराठी विभाग प्रमुख
के. बी. एच. कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
निमगांव, ता. मालेगांव जि. नाशिक

**प्रस्तावना** — आधुनिक भारतात स्त्रीला, सक्षम स्वतंत्र आणि स्वावलंबी बनविण्यासाठी फुले दांपत्याने आयुष्यभर कार्य केले. स्त्रीला समाजात मानाचे स्थान मिळावे म्हणून समाजव्यवस्थेत परिवर्तन घडवून आणले. महात्मा फुले यांनी सुरू केलेल्या क्रांतीकारी अंदोलनात संविधानात्मक रूप देण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडरांनी मोठ्या संघर्षातून केले. मनूच्या अन्याय-अत्याचारी व्यवस्थेला समूळ नष्ट करण्याचा उद्देशाने संविधानामध्ये स्त्री मुक्त, स्वतंत्र व स्वावलंबी होईल अशा हिंदू कोडबिलची बांधणी करणे म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय स्त्रीचे उध्दारक व स्त्री सक्षमीकरणाचे महान पुरूष ठरतात.

महिला सक्षमीकरणासंबंधी घटनात्मक अधिकार देण्याऱ्या हिंदू कोडबिलचे जनक म्हणून डॉ. बाबासाहेबांकडे पाहिले जाते. भारतीय समाजात अस्पृष्य स्त्री अधिक शोषीत होती. ती गुलामाचीही गुलाम होती. भारतीय स्त्रीचा इतिहास पाहता तिच्यावर सतीची चाल, बालविवाह, विजोड विवाह, पडदा पध्दती यासारख्या जाचक प्रथा लादण्यात आल्या होत्या. भारतीय महिला समाजात अपमानीत जिवन जगत होत्या, स्त्री ही भोगी आणि दासी म्हणू-न जगत होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री मुक्तीसाठी अस्पृष्य स्त्रीयांना जागृत केले. दलित परिषदेत स्त्रीयांना उद्देशून केलेल्या प्रेरणादायी भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, "तुम्ही विचार करावयास पाहिजे की, तुमच्या पोटी जन्म घेणे हे पाप का ठरले जावे व इतर स्त्रीयांच्या पोटी घेणे पुण्यप्रद का व्हावे? या प्रश्नांचा जर विचार केला तर तुम्हास एक तर प्रजा उत्पत्ती करणे बंद करावे लागेल, किंवा तुमच्यामुळे त्यांना लागत असलेला कलंक तरी तुम्हास पुसून टाकावा लागेल. तुम्ही प्रतिज्ञा करावी अशा कलंकित स्थितीत आम्ही यापुढे जाणार नाही " याच भाषणात डॉ. बाबासाहेब पुढे म्हणतात की, "वरिष्ठ वर्गाच्या बाया ज्या पध्दतीने लुगडी नेसतात त्या पध्दतीने तुम्ही लुगडी नेसण्याचा प्रघात पाडला पाहिजे तसे करण्यात तुमचे काही खर्चेत नाही. त्याचप्रमाणे गळ्यामध्ये भाराभर गळसपा व हातात कोपरभर कथलाच्या किंवा चांदीच्या पाटल्या ही देखील तुम्हाला ओळखण्याची एक खुण आहे. एका गळसपारीपेक्षा अधिक असणे आवश्यक नाही. त्यांने आपल्या नवऱ्याचे आयुष्य वाढते किंवा आपल्या शरिराला शोभा येते अशातलाही काही भाग नाही. दागिन्यापेक्षा कपड्यातच जास्त शोभा आहे. तेव्हा चांदीच्या किंवा कथलाच्या दागिन्याने पैसे खर्च करण्याऐवजी चांगल्या कपड्यांसाठी पैसे खर्च करा दागिना घालवयाचा तर तो सोन्याचा करून घालावा नाही तर घालू नये." या बाबासाहेबांच्या भाषनाने स्त्रीयांवर एवढा परिणाम झाला की दुसऱ्या दिवसा पासून स्त्रीयांच्या वेशभूषा व केशभूषातील बदलाने बाबासाहेबांना गहिवरले. यावरून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना स्त्रीयांच्या प्रती मनामध्ये किती सन्मान होता हे दिसते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतीय स्त्रीच्या शिक्षणाची बाजू घेऊन स्त्री शिक्षणाने स्वाभिमानी होईल. या विषयी कास धरली होती. या बाबत 'मुकनायक' मधून व 'म्युनिसीपल कमिटीच्या' सभेत लेखन केले. या सक्तीच्या स्त्री शिक्षणात २२ पैकी १६ सभासदांनी विरोध दर्शवला. बाबासाहेब आंबेडकर भारतीय स्त्रीच्या शिक्षणाची बाजू घेऊन स्त्री शिक्षणाने स्वाभिमानी होईल हे स्पष्ट करताना दिसतात. बहिष्कृत समाजाला आपली उन्नती होऊन आपण इतर पुढारलेल्या लोकांच्या बरोबरीने राहावे असे वाटत असल्यास त्यांनी आपल्या उन्नती गाड्याचे दुसरे चाक जो स्त्री समाज आहे. त्याची बरोबर व्यवस्था ठेवून आपल्याबरोबर शिक्षणाचा लाभ मिळवून दिला पाहिजे.



Scanned by CamScanner

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक, सांस्कृतीक, धार्मिक विषमतेच्या अमानूषते संदर्भात जागृतीसाठी नाशिक येथील काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह केला. या सत्याग्रहात अनेक अस्पृश्य स्त्रीयांनी भाग घेतला होता. गीताबाई गायकवाड यांनी स्त्रियांच्या एका तुकडीचे नेतृत्वही केले होते. या सत्याग्रहातील २७ स्त्रीयांना एक महिन्याचा तुरूंगवास भोगावा लागला होता. या सत्याग्रहाने स्त्रीयांमध्ये ऐवढी चेतना आली होती की, ७ एप्रिल १९३० रोजी शेकडो अस्पृश्य मंदिरात गेले. तर तेथील पुजाऱ्यांने मागे लोटण्याचा प्रयत्न केला तेव्हा एका स्त्रीने पुजाऱ्याच्या तोंडात खाड्कन भडकावली होती.

येवला येथील धर्मांतर परिषदेनंतर महिलांनीच ठिकठिकाणी संमेलने घडवून आणून धर्मांतर घोषणास पाठिंबा व्यक्त केला व बाबासाहेबांना नेता मानून त्यांच्या नेतृत्वाखाली वेळोवेळी होणाऱ्या सत्याग्रहात भाग घेतला. ही सर्व प्रक्रिया भारतीय स्त्रीयांमध्ये अधर्म, धर्म, समाज, संस्कृती, विषमता व विकृती विरूध्द संघर्ष पेटवणारी होती. महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरूषांनी भारतीय ब्राम्हणी धर्मातील अमानूष रूढीला व शुद्रातिशुद्रांना न्याय देण्यासाठी त्यांची महती सिध्द करण्यासाठी व या वर्गाला जागृत करण्यासाठीच वाणी व लेखणीच्या माध्यमातून आयुष्यभर संघर्ष केला.

१) **हिंदू कोड बिल : भारतीय महिला सक्षमीकरणाचे स्वातंत्र्याचे विधान** — डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तयार केलेले हिंदू कोड बिल ९ भागात १३९ कलमात आणि ७ परिशिष्टात विभागले होते. त्यात प्रामुख्याने आंतरजातीय विवाहास मान्यता, एकपत्नीत्वाचे बंधन, पुरूषाप्रमाणे स्त्रीयांना सुध्दा घटस्फोट मागण्याचा अधिकार, वारसा हक्क, मुलाइतकाच मुलीला सुध्दा वडिलांच्या संपत्तीत अधिकार, दत्तक विधानात सुधारणा इ. अधिकाराचा समावेश होतो. हा कायदा सर्व हिंदूस म्हणजे वीरशेव, लिंगायत, ब्राम्हो, प्रार्थना, आर्य समाज, अर्थात हिंदू समाज मानित असणारे लोक तसेच बौध्द, जैन व शिख यांना हे बिल लागू होते.

२) **स्त्रीला घटस्फोट घेण्याची माण्यता** — या अधिकाराद्वारे भारतीय हिंदू स्त्रीयांमध्ये स्वातंत्र्य, समता आणि उन्नतीच्या सक्षमीकरणासाठी लग्न हा एक धार्मिक संस्कार मानला होता. पूर्वी धार्मिक पध्दतीने झालेल्या लग्नास घटस्फोटाला परवानगी नव्हती पण संविधानामुळे घटस्फोटाला परवानगी मिळणार होती.

**संविधानात खालील अटी लादण्यात आल्या-**

१) एकाने दुसऱ्याचा केलेला परित्याग
२) रखेली ठेवणे
३) असह्य महारोग
४)वेडेपणा
५) गुप्तरोग
६) क्रौर्य.

अशा स्वरूपाच्या कारणामुळे कोणत्याही व्यक्तीस घटस्फोट घेण्याचा व देण्याचा अधिकार देण्यात आल

३) **स्त्रीला पोटगी मिळण्याचा अधिकार** — पोटगी संबंधीच्या कायद्यात नविन असे काही नव्हते. जो मयत असेल त्याच्यावर पूर्वी अवलंबून राहणाऱ्यांनाच मालमत्ता मिळेल. त्याच्याकडून पोटगी मिळण्याचा हक्क राहिल. या कायद्याने मान्य केलेल्या आप्तेष्टांमध्ये रखेलीचाही समावेश होता.

या विधेयकामधील दुसऱ्या कलमानुसार पत्नी पतीपासून वेगळी राहत असेल तर तिलाही पतीपासून पोटगी मागण्याचा हक्क मान्य करण्यात आला होता. जुन्या कायद्या प्रमाणे ती पतीच्या घरात राहत नसेल तर तिला



Scanned by CamScanner

हा अधिकार नव्हता आणि पतीचे ज्यावर नियत्रण नाही अशा कारणासाठी ती पतीपासून दूर राहून पोटगी मागू शकते.

या कायद्यामध्ये —

१) पतीला रोग असणे
२) त्याने रखेल ठेवणे
३) तिला दुष्टपणाने वागवणे
४) दोन वर्षाहून अधिक काळ तिला सोडून देणे
५) त्याने धर्मांतर करणे

या सर्व कारणावरून स्त्रीला पोटगी मागण्याचा अधिकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू कोड बिलमध्ये प्रस्थपित करून स्त्रीला नैसर्गिक समतेचा अधिकार मिळवून दिला होता.

४) **स्त्रीला वारसा मिळण्याचा हक्क** — या नव्या विधेयकाने सर्व भारतासाठी दायभाग पध्दती सूचवली होती. तिच्या नियमाप्रमाणे वारसात मिळालेली मालमत्ता त्याच्या वैयक्तीक मालकीची असेल देणगी देऊन मृत्यूपत्र करून किंवा दुसऱ्या कोणत्याही पध्दतीने तिची विल्हेवाट लावण्याचा अधिकार त्याला राहील. या कायद्याने मुलीसाठी मुलांच्या वाटणीतील अर्धा वाटा मिळणार होता.

स्त्रीयांच्या बाबतीत या विधेयकाने दोन बदल केले. "पहिला बदल हा की स्त्री धनाचे निरनिराळे प्रकार आता मालमत्ता म्हणून एकत्र केले जातील. आणि तिचा वारसा कोणाला मिळावा याबद्दल एकच नियम असेल. संविधानात आता मुलालाही वारसा मिळणार असून मुलाचा हिस्सा मुलीच्या अर्धा असेल. बापाच्या मालमत्तेच मुलीला आर्धा भाग देऊन मुलगा व मुलगी या समानतेने वागविण्याचा विधेयकाचा प्रयत्न होता." या कायद्यामुळे संपत्तीत मुलीलाही अधिकार प्राप्त झाले होते ही महिला सक्षमीकरणातील मोठी घटना होती.

५) **भारतीय राज्यघटना आणि स्त्री** — मनूने आखून दिलेली चौकट प्राचीन काळा पासुन समाजातील पुरूषांच्या बरोबर असणाऱ्या स्त्रीया निमुटपणे आचरण करित होत्या. जीवनाच्या सर्व क्षेत्रात स्त्रीयांना हिन लेखनाऱ्या मनुस्मृतीला आव्हाण देत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मनुस्मृतीचे दहन केले, आणि त्यांनीच समतेवर आधारित भारतीय समाजात राज्यघटना बहाल केली. २६ जानेवारी १९५० हा दिवस भारतीय लोकशाही समाजव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून समता, स्वतंत्र्य, बंधुता, न्याय देणारा आहे. अर्थात सर्व प्रकारची विषमता, लिंगभेद, जातीयता उच्चनीचता यांना संपुष्टात आणणारी ही राज्यघटना म्हणजेच मनुस्मृतीचा आरंभ होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मनुस्मृतीच्या प्रतिकात्मक दहनाचे समर्थन करतांना डॉ. प्रदिप गोखले म्हणतात. "मनु ही एक व्यक्ती असो किंवा अनेक व्यक्ती असोत त्या व्यक्तीने किंवा व्यक्तींनी मिळून नियमांचे संकलन केलेले असो किंवा स्वत: नियम घालून दिलेले असोत मनुस्मृती जेव्हा अस्तित्वात आली त्यावेळी तिच्याकडे केवळ समाजातील चालू असलेले रीती-रिवाज संकलित करणारा ग्रंथ म्हणून मुळीच पाहिले गेलेले नाही. तर समाजाचे रहाटगाडे सुरळीत चालवण्यासाठी सवर्णांनी स्त्री शुद्रातिशुद्रांना मार्गदर्शन ग्रंथ म्हणूनच तो मानला. मनुस्मृतीला जाळणे व त्या जागी नवी स्त्री शुद्रातिशुद्र नव्हे तर प्रत्येक मानवी घटक स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय या सुत्राात बांधणारे संविधान देणे हे महत्तम कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले.

स्वातंत्र्य , समता आणि बंधुता यावर आधारीत भारतीय राज्यघटना म्हणजे केवळ एक ग्रंथ नसून ती स्त्री शुद्रातिशुद्रांच्या जीवनाला नवी मानवतेची दिशा देणारी लोकशाही समाजाची जोपासना व संरक्षण करणारी संहिताच आहे. भारतीय समाजाला संधीची समानता, व्यक्तीची आणि राष्ट्राची एकता प्रस्थापित करणारी बंधुना



Scanned by CamScanner

देणारी ही राज्यघटना प्रत्येक भारतीय समाजातील व्यक्तीच्या जीवनाचा जाहिरनामाच आहे. स्त्री अथवा शुद्र असो मानवतेचे मुलभूत हक्क प्रधान करणारे तत्व म्हणजे मूलभूत अधिकार होत.

६) **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार कार्याचा महिला सक्षमीकरणावरील परिणाम** — डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानातील समतेच्या अधिकारामुळे स्त्रीयांना स्वातंत्र्य मिळाले. महिला समाजातील विविध संस्थात महिला स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावल्या व पारंपरिक समाज संस्कृतीने विषमतेवर आधारलेल्या मुल्यांनी सामाजिक व सांस्कृतीक चौकट स्त्रीयांना बंदिस्त करण्यासाठीच निर्माण केली होती. गुलामीची जाचक बंधने निर्माण केली होती. या बंधनात धर्म, संस्कृती व पावित्र्याची जोड देऊन स्त्रीयांवर लादण्यात आले होते. महिलांना स्वत:चे मन, बुध्दी, इच्छा, आकाक्षा स्वतंत्रपणे व्यक्त करता येत नव्हत्या. एक अगतिक, लाचार, दुर्दवी अशी भारतीय महिलेची प्रतिमा करण्यात आली होती. यासर्व सामाजिक, मानसिक, धार्मिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतीक स्थितीचा विचार महिला सक्षमिकरणाच्या दृष्टीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधान व 'हिंदू कोड बिल' च्या माध्यमातून भारतीय स्त्रीयांमध्ये नवचैतन्य निर्माण करून कर्तृत्ववान स्त्रियांना सन्मानाने पुरूषांबरोबर आणून ठेवले. भारतीय संविधानात दिलेल्या अधिकाराचा परिणाम निश्चितच महिलांचा दर्जा बदलण्यात आला आहे.

७) **मुस्लीम स्त्रीविषयक विचार** — हिंदू स्त्रीवर जशी धर्म परंपरेने गुलामी लादलेली होती. तशीच विवारक स्थिती मुस्लीम स्त्रीची ही होती. भारतीय मुस्लीम स्त्रियांची स्थिती स्पष्ट करतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात. "सक्तीच्या पडदा पध्दतीमुळे मुस्लीम स्त्रीया समाजापासून एकाकी पडत होत्या. कुटूंबांत स्त्रीयासाठी वेगळी खोली असे. त्यांना त्यातच काम करणे अपेक्षित आहे. त्यांना प्रार्थनेसाठी मशिदीत जाण्याची परवानगी नव्हती घरा बाहेर पडण्याची वेळ आलीच तर बुरखा घालने आवश्यक होते. पडदा पध्दतीने या स्त्रीया मानसिक दृष्ट्या खचल्या जातात. त्याचे सामाजिक आरोग्य हिरावून घेतल्यामुळे त्यांचा नैतिक ऱ्हास होण्याची प्रक्रिया सुरू होते. डॉ. बाबासाहेब आबेंडकर म्हणतात —"पडदा पध्दतीमुळे गुलामगिरीच्या मनोवृत्तीची आणि न्यूनगंडाची भावना निर्माण होते. भित्रेपणा वाढत जातो. जीवनातील कोणत्याही संघर्षाला ती समर्थपणे तोंड देवू शकत नाही."

डॉ. बाबासाहेबांचे स्त्री मग ती हिंदू अथवा मुस्लीम असो,ती शेषित, गुलामित, पारतंत्र्यात असू नये. तिचे स्वतंत्र्य, सक्षम, स्वावलंबी व मुक्त जीवन जगावे यासाठी क्रांतीकार्य व मौलिक विचारही मांडले आहेत. मुस्लीम धर्मात स्त्रीविषयक कायदे स्त्रीयांच्या बाजूचे असूनही ते कायदे उपभोगण्याचे ज्ञान त्यांना मिळू न दिल्याने मुस्लिम स्त्री एक असाह्य व्यक्ती आहे असे स्पष्ट होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वातंत्र्य सक्षमीकरण व स्वावलंबन यासाठी जीवनध्येय समजून कार्य केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारकार्यांचा महिला सक्षमीकरणावर दूरगामी स्वरूपाचा परिणाम झाला. स्त्री स्वातंत्र्याचा कक्षा रुंदावल्या त्यांच्या समतेच्या अधिकारामुळे स्वातंत्र्य मिळाले. सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, धार्मिक, राजकिय आणि सांस्कृतिक क्षेत्रात स्त्रीयांची प्रगती झाली वर्तमान काळातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारख्या महापुरूषांच्या कृतीकार्याचा परिणाम आहे.

**संदर्भ** —

१) भारताचे संविधान – महाराष्ट्र प्रशासन, मुंबई १९८९
२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि 'हिंदू कोड बिल' – रत्नाकर गणवीर-नेहा प्रकाशन, नागपुर -२००४
३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर बहिष्कृत भारत आणि मूकनायक –
संपादक – वसंत मून, शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन मुंबई १९९०
४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लेखन आणि भाषणे खंड १८ भाग - संपादक – वसंत मनू आणि इतर.



Scanned by CamScanner